महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४००००१
दूरध्वनी क्र: ०२२-२२०१३५७८ **Email ID :** soyojana11.rdd-mh@nic.in

---

क्र. मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२/यो-११ दिनांक:- ०७ ऑगस्ट,२०२५

राज्यस्तरीय कार्यशाळा दि.२१.०८.२०२५

**प्रति,**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) ,
२. अपर आयुक्त, (विकास) व (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व),
३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व),
४. प्रकल्प संचालक (ग्रामीण विकास यंत्रणा) (सर्व),
५. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) (सर्व),
६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) तथा प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन) (सर्व),
७. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा), जिल्हा परिषद (सर्व),
८. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) **(अनु. ३ ते ८ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत रवाना)**

**विषय- मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत राज्यस्तरीय कार्यशाळा व प्रशिक्षण वर्ग आयोजनाबाबत.**

**संदर्भ-** ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र:-मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२,E-११२३०५७ दि.०६ ऑगस्ट, २०२५.

महोदय,

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" या शासनाच्या महत्वाकांक्षी अभियानाला संदर्भादिन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अभियान राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी मा.मंत्री (ग्राम विकास व पंचायत राज) यांच्या अध्यक्षतेखाली व मा.राज्य मंत्री (ग्राम विकास व पंचायत राज) यांच्या प्रमुख उपस्थितीत **दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता, गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट, पुणे** येथे राज्यस्तरीय कार्यशाळेचे व प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यशाळेस व प्रशिक्षण वर्गास वरीलप्रमाणे अधिका-यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

२. तसेच या कार्यशाळेला प्रत्येक जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या **१५ सरपंच व १५ ग्रामसेवक** यांची आपल्या स्तरावरून निवड करून, त्यांना सदर प्रशिक्षण वर्गाकरिता उपस्थित राहण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी द्याव्यात व जिल्हानिहाय अश्या उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींची यादी वर नमूद इ-मेल वर तसेच, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना दि.१४.०८.२०२५ पर्यंत निश्चितपणे पाठवावी.

आपला,

(कालू वळवी)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:-

१. मा.मंत्री (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे खाजगी सचिव, २. मा.राज्य मंत्री (ग्रा.वि. व पं.रा.)) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव अग्रेषित. ३.मा.प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.)) यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पुणे, ५.संचालक, राष्ट्रीय ग्रामीण स्वराज्य अभियान, पुणे,